प्रेस नोट दि - २२/०५/२०१९

हि-याचे दागिण्याचा अपहार करणारा बडोदा गुजरात येथुन जेरबंद, तेवीस लाखाचा ऐवज हस्तगत

श्रीमती गिता सतिश नहार वय ५० वर्षे धंदा- व्यापार रा - श्रीफळ बंगला नं. ३८, सुजय गार्डन, मुकुंदनगर, पुणे. यांचे सुजय गार्डन कमर्शियल कॉम्पलेक्स, स्वयंभू बिल्डींग मुकुंदनगर पुणे येथे रियल डायमंड अँड कंपनी नावाचे शोरुम आहे. त्या हि-यांचे दागिने बनविण्याचा व ते होलसेल व रिटेल भावामध्ये विकण्याचा व्यवसाय करतात संशयीत मयुर शहा हा त्यांचेकडे मार्केटींग मॅनेजर म्हणून नोकरीस होता.

दि - ३०/०८/२०१८ रोजी फिर्यादी यांनी त्यांचे दुकानातील कामगार मयुर शहा याचेकडे किंमत रुपये ३९,५५,०००/- (रुपये एकोणचाळीस लाख पंचावन्न हजार फक्त) चे हि-याचे दागीने हॉल मार्कीग साठी व लॅब तपासणी करीता दिले असताना सदर दागिने त्याने परत न देता दागिण्याची विल्हेवाट लावुन अपहार करुन फसवणुक केली आहे. गुन्हा केल्यानंतर संशयीत आरोपी याने स्वतःला विषबाधा झाली आहे त्यावेळी दागिने कोठे तरी पडल्याचा बनाव केला होता व त्यानंतर तो पळुन गेला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी त्याचेविरुध्द पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे. त्याबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन गु र नं – ४२६/२०१८ भा दं वि कलम ४०८ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे गुन्हयाचा समांतर तपास करत असताना पोलीस कर्मचारी किशोर शिंदे व मेहबुब मोकाशी यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की संशयीत मयुर शहा हा सुभानपुरा बडोदा गुजरात येथे आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांचे एक पथक बडोदा गुजरात येथे गेले होते . तेथील स्थानिक पोलीसांची मदत घेवुन पोलीसांनी सापळा लावुन संशयीत इसम मयुर कन्हैयालाल शहा वय – ४७ रा – सिल्व्हर अपार्टमेंट सुभान पुरा बडोदा गुजरात यास ताब्यात घेतले आहे. त्यावेळी त्याने प्रथम माहीती देण्यास टाळाटाळ केली परंतु पोलीसांनी त्याचेकडे बारकाईने सखोल तपास केला त्यावेळी त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली व गुन्हयातील हि-यांचे दागिने स्वतःचे मालकीचे आहेत असे सांगुन ते पुणे, मुंबई येथील दुकानदारांना दिल्याचे सांगीतले. पोलीसांनी मुंबई, पुणे येथे तपास करुन त्याचेकडुन एकुण किंरु - २२,९०,०००/- (रुपये बावीस लाख नव्वद हजार फक्त) चे सोने व हि-यांचे दागिने हस्तगत केले आहेत. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट नं ८ शिवाजीनगर पुणे यांनी आरोपीस दि - /०५/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक निकम, पोलीस उप निरी श्री. किरण अडागळे, संजय गायकवाड व पथकातील पोलीस कर्मचारी किशोर शिंदे, राहुल घाडगे, मेहबुब मोकशी, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, दत्तात्रय गरुड, अतुल साठे, संदीप राठोड, सुजित पवार यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढील अधिक तपास पोलीस उप निरीक्षक किरण अडागळे हे करीत आहेत.


REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA